# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन
२०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

( विद्या विभाग )

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३

गोविग/विद्या/क्र/१११/२१ दि. १२/०२/२०२१

प्रति,

मा.प्राचार्य,
विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

विषयः–महाविद्यालयांच्या सुरक्षा अंकेक्षणाबाबत.
संदर्भः– १) संचालयाचे पत्र क्र. उशिसं/२०२०–२१/सुरक्षा अंकेक्षण/मवि–०१/१३६९, दिनांक ०३/०२/२०२१.
२) सहसंचालक उच्च शिक्षण विभाग क्र.:उशिनाग/आस्था/सुरक्षा अंकेक्षण/८६४/२०२१ दिनांक १२/०२/२०२१

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व वसतिगृहे यांच्या सुरक्षा अंकेक्षणाबाबत महाविद्यालयात आवश्यक ती कार्यवाही घेण्यात यावी. तसेच कोव्हिड–१९ च्या प्रतिबंधात्मक उपयायोजनांच्या अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीनंतर प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. दक्षतेच्या उपाययोजना म्हणून महाविद्यालयांनी त्यांच्या इमारतींचे व परिसरांचे खालीलप्रमाणे अंकेक्षण करणे आवश्यक आहे.

१) विद्युत पुरवठा व उपकरणे सेवेचे अंकेक्षण.

२) इमारत बांधकाम मजबूती व रचना अंकेक्षण

३) हरीत अंकेक्षण

४) पाणी पुरवठा अंकेक्षण

उपरोक्त नमूद अंकेक्षणे सुरक्षतेचे उपाययोजना करून महाविद्यालये उघडण्यापूर्वी तातडीने करण्यात यावी व त्याचा अनुपालन अहवाल विद्यापीठाला तातडीने सादर करण्यात यावा.
धन्यवाद!

१२/०२/२०२१

(डॉ.अनिल चिताडे)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली